| MHAH070000872025 | दाखल दिनांक | : | २२/०१/२०२५ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २३/०१/२०२५ |
| | निकाल दिनांक | : | ०३/१०/२०२५ |
| | कालावधी | : | ०८ महिने ११ दिवस |

जिल्हा न्यायाधीश २ संगमनेर यांचे न्यायालयात,

तालुका – संगमनेर जिल्हा अहिल्यानगर

(न्यायाधीश– मंदार नेरलेकर)

दिवाणी संकिर्ण अर्ज क्र.११ सन २०२५

निशाणी क्र.२१

नम्रता किशोर साळुंके
वयः– ३०, उद्योग– गृहिणी,
रा. टाकळी, ता.अकोले, जि. अहिल्यानगर अर्जदार

विरुद्ध

किशोर रमेश साळुंके
वयः– २६, उद्योग– व्यवसाय,
रा.साकूर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर उत्तरार्थी

पालक व पाल्य अधिनियम कलम ६ व ७ अन्वये चौकशी अर्ज.

विधीज्ञः-

अर्जदारातर्फे श्री. एस.एन.शिंदे

उत्तरार्थीतर्फे श्री. के.डी.दारोळे

–:न्यायनिर्णय:–

(दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी घोषीत)

१. मुलगा देवांशचा उत्तरार्थीकडून ताबा मिळण्यासाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

<u>अर्जातील कथने</u>–

अर्जदार व उत्तरार्थीचे लग्न दि.२५.०३.२०२२ रोजी झाले असून त्यांचे लग्नसंबंध अदयाप कायम आहे. अर्जदारास सदर विवाहसंबंधातून देवांश दि.१३.१०.२०२३ रोजी झाला. लग्नानंतर सुरुवातीचे दोन ते तीन महिने अर्जदारास व्यवस्थित नांदवले. त्यानंतर उत्तरार्थीच्या दोन बहिणी, आई यांनी मिळून अर्जदार व उत्तरार्थी यांचे कुटुंबात विनाकारण लक्ष घालून अर्जदारास शारिरिक व मानसिक त्रास देण्यास सुरवात केली. ते किरकोळ कारणावरुन अर्जदाराविषयी भडकावत असत. त्यावरुन उत्तरार्थी अर्जदारास मारहाण करत असे. उत्तरार्थीचे मेहुणे व मोठी बहीण यांचे अंगावर काळुबाई व खंडोबा देवाची हवा असल्याने ते उत्तरार्थीस अर्जदाराबद्दल भडकावत होते व सांगत असे की, "तुझा संसार अर्जदाराबरोबर होणार नाही, तुझे आणि हिचे पटणार नाही, तु तिला गेलेले दिवस काढून टाक" उत्तरार्थीने अंधश्रद्धेने अर्जदाराचे पोटात लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व " तु हे पाडून टाक नाहीतर माझ्याइतके कोणी वाईट नाही" असे म्हणून अर्जदारास शारिरिक व मानसिक त्रास देवू लागला.

२. उत्तरार्थी व कुटुंबातील इतरांनी अर्जदाराकडे टपरी सुधारणेसाठी वडीलांकडून रुपये एक लाखाची मागणी केली. त्यास तिने नकार दिला असता तिला मारहाण करुन तिचे अंगावरील दागदागिने हिसकावून तिला दि.२३.०३.२०२३ रोजी घराबाहेर काढले. त्यानंतर उत्तरार्थीने अर्जदाराचे वडीलांचे घरी येवून तिला दमदाटी करुन पैशाची मागणी केली. त्याबाबत अर्जदाराने दि.२९.०५.२०२३ रोजी अकोले पोलीस ठाणेला गुन्हा रजि.क्र.६५२/२०२३ अन्वये तक्रार दिली. त्यानंतर अर्जदाराने व तिचे नातेवाईकांनी अनेकदा उत्तरार्थीकडे नांदण्यास जाण्यासाठी प्रयत्न केले असता उत्तरार्थीने अर्जदारास घरात घेतले नाही. तिला नांदविण्यास स्पष्ट नकार दिला.

३. अर्जात पुढे कथन असे की, दि.१३.१०.२०२३ रोजी अर्जदारास मुलगा झाला. सदरची बाब उत्तरार्थी व त्याचे कुटुंबातील लोकांना कळवूनही ते बाळाला भेटायला आले नाहीत अगर त्यांची विचारपुस केली नाही. मुलगा झाला म्हणून उत्तरार्थीच्या वागण्यात बदल होईल या आशेने अर्जदार स्वतःहून नांदण्यास गेली परंतु

घरातील सर्वच तिला पुर्वीपेक्षा जास्तच त्रास देवू लागले. मे २०२४ मध्ये उत्तरार्थी व त्याचे आईने अर्जदाराबरोबर विनाकारण भांडण केले व तिला मुलगा देवांशसह घरातून हुसकावून दिले. त्यानंतर मध्यस्थांनी उत्तरार्थीस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्याने अर्जदारास नांदविण्यास नकार दिला. अशाप्रकारे उत्तरार्थीने अर्जदार व मुलाचा स्वतःहून त्याग केला. दि.१७.१२.२०२४ रोजी उत्तरार्थीने अर्जदारास फोन करुन तिच्याशी गोड बोलून "मला तुला व मुलाला भेटायचे आहे" असे म्हणून तिच्या माहेरी आला. मुलगा देवांश यास घेतले व मुलाला खाऊ घेवून देतो असे म्हणून बाहेर गेला व मुलगा देवांश यास घेवून त्याचे घरी निघून गेला. त्यावेळी अर्जदार व तिचे आईवडील यांनी मुलगा देवांश व उत्तरार्थी यांचा शोध घेतला परंतु ते मिळून न आल्याने त्यांनी पोलीस ठाणेला तशी फिर्याद दिली. त्यानंतर अर्जदाराने उत्तरार्थीकडे नांदण्यास जाण्याचा व मुलाला भेटण्याचा प्रयत्न केला परंतु उत्तरार्थी मुलाला भेटू देत नाही व तिचेशी संपर्क होवू देत नाही.

४. अर्जात पुढे कथन असे की, मुलगा देवांश १५ महिन्यांचा असून तो आईचे अंगावर दुध पितो. त्याला आईच्या मायेची गरज असून तो आईशिवाय राहू शकत नाही. परंतू उत्तरार्थी व त्याचे कुटुंबीय हे जाणूनबुजून देवांशला अर्जदारापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. उत्तरार्थी पासून अर्जदाराचा अज्ञान मुलाचे जिवीतास धोका आहे. उत्तरार्थी रागाच्या भरात मुलाचा कधी घात करील याचा भरवसा राहिलेला नाही. उत्तरार्थीने मुलाला कधीही व्यवस्थित सांभाळले नाही. उत्तरार्थी जास्त काळ घराबाहेरच राहतो त्यामुळे मुलाला वडीलांचा लळा नाही. मुलाला अर्जदाराचा लळा आहे, तो अर्जदाराकडे जाण्यासाठी रडत आहे. अर्जदारच जनक आई या नात्याने मुलगा देवांश याचा सांभाळ योग्य पद्धतीने करु शकते. मुलगा देवांश वारंवार रडत राहिल्यास त्याचे तब्येतीवर, बालमनावर सदर गोष्टीचा परिणाम होण्याची शक्यता आहे. उत्तरार्थीचे दारुचे व्यसनामुळे घरातील वातावरण सुसंस्कृत नाही. तो घरात नेहमी शिवीगाळ व असभ्य वर्तन करतो. यासर्व वातावरणात मुलगा देवांश याचे संस्कार बिघडणार आहेत. त्याचे भवितव्य धोक्यात येणार आहे. मुलगा देवांशचा ताबा मिळणेसाठी अर्जदाराने अकोले न्यायालयात क्रि.एम.ए.क्र.२०५/२०२४ दाखल केला होता. सदर अर्ज नामंजूर

केला आहे. परंतु मुलगा देवांश अत्यंत लहान म्हणजे फक्त १५ महिन्यांचा असल्याने त्याचा ताबा आई म्हणून अर्जदारास मिळणे गरजेचे आहे.

उत्तरार्थीचे लेखी उत्तर नि.१४-

५. उभय पक्षकारांचे नातेसंबंध व त्या लग्न संबंधांतून दि.१३.१०.२०२३ रोजी देवांशचा जन्म झाला ही वस्तुस्थिती उत्तरार्थीने मान्य केली आहे. अर्जातील उर्वरित कथने अमान्य केली. उत्तरार्थीचा बचाव असा आहे की, लग्न झाल्यानंतर अर्जदार उत्तरार्थीकडे नांदण्यास आली त्यावेळी कुटुंबामध्ये अर्जदार, उत्तरार्थी व त्याची आई असे एकत्रात राहत होते. उत्तरार्थीस दोन बहिणी असून त्यांचे लग्न झाले आहे. त्या त्यांच्या सासरी नांदत आहेत. उत्तरार्थीचा भाउ त्याच्या कुटुंबासोबत वेगळा राहतो. उत्तरार्थीस वडील नाही. उत्तरार्थीचे साकुर येथे वडा व भजे चालविण्याचे छोटेसे हॉटेल असून तो त्यावर त्याचे कुटुंबाची उपजीविका भागवतो. अर्जदार व उत्तरार्थी यांचा हा दुसरा विवाह आहे. उत्तरार्थी यास कोणतेही व्यसन नसून त्याने व त्याचे कुटुंबीयांनी अर्जदाराचा कधीही शारिरिक व मानसिक त्रास दिला नाही. अर्जदाराने १५ दिवसातच वाद घालण्यास सुरवात केली व वेगळे राहण्याची मागणी केली. उत्तरार्थीने त्यास नकार दिला असता अर्जदार उत्तरार्थीस न सांगता माहेरी निघून गेली. त्यानंतर अर्जदाराची समजूत काढून पुन्हा नांदण्यास आली. असा प्रकार ब-याच वेळा झाला. दरम्यानचे काळात अर्जदारास दिवस गेले. त्यावेळी मार्च २०२३ मध्ये अर्जदार गर्भवती असताना विनाकारण वाद घालून निघून गेली. अशातच देवांशचा जन्म झाला. उत्तरार्थी व त्याचे कुटुंब त्याला भेटण्यास गेले असता त्यांना भेटू दिले नाही. मुलगा देवांश पाच ते सहा महिन्यांचा असतांना अर्जदार उत्तरार्थीकडे नांदण्यास आली. त्यावेळेस अर्जदाराने विनाकारण कुटुंबामध्ये वाद घातले व वेगळे राहण्याची मागणी केली. सदर त्रासाला कंटाळून उत्तरार्थी त्याचे आईला सोडून कामधंदा सोडून मौजे रायतेवाडी ता.संगमनेर येथे खोली भाडयाने घेवून राहू लागले. सुमारे एक महिन्यानंतर उत्तरार्थी अर्जदारास म्हणाला की, आपण साकुरला आईला भेटून येवू. त्यास अर्जदाराने नकार देवून जून २०२४ मध्ये वाद घालून मुलगा देवांश यास सोडून परस्पर निघून गेली. त्यानंतर उत्तरार्थीने अर्जदारास नांदविण्याकामी मुलाच्या भविष्याचा विचार करुन ब-याच वेळा

प्रयत्न केले. परंतु अर्जदाराने नांदण्यास नकार देवून घटस्फोटाची मागणी करुन उत्तरार्थीकडे दोन लाखाची मागणी केली.

६. उत्तरार्थीचे पुढे असे कथन आहे की, अर्जदाराने स्वतःहून मुलगा देवांश व उत्तरार्थीचा त्याग केला आहे. त्यानंतर अर्जदाराने अकोले येथे बीएनएसएस कलम १०० प्रमाणे अर्ज दाखल केला. सदरच्या अर्जामध्ये काहीही तथ्य नसल्याने अर्जदाराचा अर्ज रद्द केला. वास्तविक पाहता सदरच्या अर्जावर अपील करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे होते. तसे न करता अर्जदाराने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणतेही वाजवी कारण घडलेले नाही. अर्जदाराने स्वतः नांदण्यास नकार दिला आहे. उत्तरार्थी मुलगा देवांशची व्यवस्थित देखभाल करुन त्याचे पालनपोषण, औषधोपचार व्यवस्थित करत आहे. उत्तरार्थी दुकानात गेल्यावर त्याची आई म्हणजेच देवांशची आज्ञी चांगल्याप्रकारे त्याचा सांभाळ करत आहे. सदरचा अर्ज खोटा, बनावट व काल्पनिक असून कायदयास धरुन नाही. मुलगा देवांश हा अर्जदारास ओळखत नाही. त्यामुळे यासर्व कारणास्तव अर्जदाराचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

युक्तीवाद–

७. अर्जदाराचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.एन.शिंदे यांचा युक्तीवाद असा आहे की, अर्जदार व उत्तरार्थीचे लग्न दि.२५.०३.२०२२ रोजी झाले. मुलगा देवांशचा जन्म दि.१३.१०.२०२३ रोजी झाला. अर्जदाराला दि.२३.०३.२०२३ रोजी मारहाण करुन घराबाहेर काढले. अर्जदाराला उत्तरार्थीने अंधश्रद्धेतून मारहाण केली. त्याबाबत अर्जदाराने दि.२९.०५.२०२३ रोजी गुन्हा रजि.क्र.६५२/२०२३ नोंदविला. दि.१७.१२.२०२४ रोजी उत्तरार्थी माहेरी आला व खाऊ घेण्याच्या बहाण्याने देवांशला घेवून गेला. देवांशचे अंदाजे वय १९ महिन्यांचे आहे. देवांशला आईच्या मायेची गरज आहे. अर्जदाराला देवांशला भेटू देत नाहीत. उत्तरार्थीची टपरी दारु दुकानाजवळ आहे. तेथे देवांशला सांभाळले जाते. त्याचे बालमनावर वाईट परिणाम होतात. उत्तरार्थी बाहेरख्याली आहे.

८. उत्तरार्थीचे सुविद्य विधीज्ञ श्री. के.डी.दारोळे यांचा युक्तीवाद असा आहे

की, अर्जदाराने अकोले येथील न्यायालयात बीएनएसएस कलम १०० प्रमाणे अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज नामंजूर झाला आहे. त्याबाबत अर्जदाराने अपील केले नाही. अर्जदाराने उलटतपासात कबूल केले की, तिला देवांशने ओळखले नाही. अर्जदाराने देवांशला सोडल्यावर उत्तरार्थीने त्याचे संगोपन केले. उत्तरार्थीची आई देवांशचे संगोपन करते. उत्तरार्थी अर्जदारास नांदण्यास तयार आहे परंतु अर्जदार नांदत नाही. अर्जदाराने उत्तरार्थीला नोटीस दिली नाही किंवा पोलीसांकडे तक्रार केली नाही. देवांशला उत्तरार्थीचा त्रास असल्याचा पुरावा नाही. देवांशला अर्जदार टाकून गेली. उत्तरार्थी नित्य नियमाने व्यायाम करतो. तो व्यायाम प्रशिक्षक आहे. उत्तरार्थीला कोणतेही व्यसन नाही.

९. उभय पक्षकारांची विवाद्य कथने व युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुत अर्जाचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | देवांशचे हित व संगोपनासाठी त्याचा ताबा कोणाकडे देणे न्यायोचित आहे ? | अर्जदार नम्रताकडे |
| २ | आदेश ? | अर्ज अंशतः मान्य केला आहे. |

## <u>**का र ण मि मां सा**</u>

<u>मुद्दा क्र.१</u> –

१०. अर्जदार नम्रताने अर्जाचे कथनांचे समर्थनार्थ तिचा स्वतःचा पुरावा प्रतिज्ञालेख नि.८ दाखल केला. उत्तरार्थीने त्याचे नि.१४ चे बचावाचे समर्थनार्थ त्याचा पुरावा प्रतिज्ञालेख नि.१७ दाखल केला.

११. अर्जदार नम्रताचा उलटतपास (नि.८) उत्तरार्थीचे सुविद्य वकीलांनी घेतला त्या उलटतपासात नम्रताने खालील नमुद कबूली दिल्याः-

अ. उत्तरार्थी किशोरची छोटी टपरी असून तो वेफर्स, शेंगदाणे, फुटाणे विकतो.

ब. ती मॉलमध्ये कामाला जाते. त्याठिकाणी देवांशला घेवून किशोर आला

असता देवांशने तिला ओळखले नाही.

१२. उत्तरार्थी किशोरचा उलटतपास (नि.१७) अर्जदाराचे सुविद्य वकीलांनी घेतला त्या उलटतपासात किशोरने खालील नमुद कबूली दिल्याः-

अ. दि.२३.०३.२०२३ पासून नम्रता तिच्या माहेरी राहत आहे.

ब. नम्रताच्या माहेरच्या लोकांनी घारगाव पोलीस ठाण्यात माझ्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.

**क. माझी भजी पावची टपरी आहे. त्या टपरीशेजारी दारु दुकान आहे.**

१३. उभय पक्षकारांची विवाद्य कथने, सादर पुरावा व युक्तीवाद साकल्याने विचारात घेतला असता खालील नमुद उभयमान्य वस्तुस्थिती आहेः-

अ. उभय पक्षकारांचे पती पत्नी नातेसंबंध व त्या संबंधातून देवांशचा दि.१३.१०.२०२३ रोजी झालेला जन्म.

ब. उभय पक्षकार सध्या एकत्र नांदत नसून अर्जदार नम्रता दि.२३.०३.२०२३ पासून तिच्या माहेरी वास्तव्यास आहे.

क. सुमारे दोन वर्षे इतके कमी वय असलेल्या देवांशचा ताबा सध्या उत्तरार्थी किशोरकडे आहे.

ड. उत्तरार्थी किशोरची टपरी दारु दुकानाशेजारी आहे.

१४. अर्जात व अर्जदाराचे नि.८ चे पुरावा प्रतिज्ञालेखामध्ये किशोर व त्याच्या कुटुंबियांकडे नम्रताचा झालेल्या छळाबाबतचे आरोप तसेच नम्रताच्या वर्तनाबाबत किशोरने नि.१४ चे लेखी उत्तरात व नि.१७ चे पुरावा प्रतिज्ञालेखात केलेले आरोप प्रस्तुत चौकशी अर्जाचे न्यायनिर्णयासाठी अनावश्यक व गैरलागू आहेत.

१५. वय वर्षे २ पुर्ण होण्याच्या उंबरठयावर असलेल्या देवांशचे हित, त्याचे निकोप संगोपन हा एकमेव निकष प्रस्तुत चौकशी अर्जाचे न्यायनिर्णयासाठी आवश्यक आहे.

१६. पती पत्नीचे वाद व विसंवादाची सर्वाधिक झळ बसणारा घटक म्हणजे त्यांचे अपत्य असते ही दुर्देवी वस्तुस्थिती आहे. बालकाचे निकोप संगोपनासाठी त्याला मातेचे वात्सल्य, प्रेम व पित्याचा आधार मिळणे आवश्यक असून सुद्धा विभक्त पती पत्नीमुळे असे बालक यापैकी एका गरजेपासून वंचित राहते. देवांशचे शारिरिक, मानसिक, बौद्धीक, शैक्षणिक निकोप प्रगतीसाठी त्याला माता व पिता या दोघांचा आधार मिळणे व वाद विवाद रहित कौटुंबिक सौख्य मिळणे आवश्यक असतांना दुर्देवाने तो त्यापासून वंचित आहे.

१७. उपरोक्त नमूद विवाद्य कथने व पुराव्याचे विश्लेषणाद्वारे असे निदर्शनास येते की, अर्जदार ही देवांशची जनक आई आहे. मे २०२४ पासून अर्जदार ही उत्तरार्थीपासून तसेच देवांश या तिच्या मुलापासून विभक्त तिचे माहेरी राहत आहे.

१८. देवांशचा शारिरिक, मानसिक, भावनिक, बौद्धीक असा सर्वकष विकास होणे व त्याचे हित व कल्याण जपले जाण्याचे सर्वोच्च प्राधान्य हे निकष विचारात घेता त्याला मातृप्रेम मिळणे आवश्यक आहे ही बाब निर्विवाद आहे. अर्जदार नम्रता या नोकरी करतात ही बाब देवांशचा ताबा आईकडे देणेस आडकाठी/अडसर ठरु शकणार नाही. पतीपासून विभक्त झाल्यानंतर स्वतःचे उदरनिर्वाहासाठी अर्जदाराला अर्थाजन करावे लागणे अपरिहार्य आहे. अर्जदार नोकरीनिमित्त घराबाहेर असेल त्यावेळी देवांशची देखभाल व संगोपनासाठी अर्जदार यांचे आईवडील अथवा अन्य कोणी जवळचे नातेवाईक जबाबदारी घेवू शकतील. देवांशचा सर्वंकष विकास, हित व संगोपनाचा विचार करता त्याचा ताबा त्याचे जनक आईकडे म्हणजेच अर्जदाराकडे देणेचा आदेश न्यायोचित ठरेल. देवांशचे वय १ वर्षे ११ महिने आहे. Hindu Minority and Guardianship Act 1956 चे कलम ६ व ७ चे तरतुदीनुसार पाच वर्षांपर्यंतच्या बालकाची नैसर्गिक पालक आईच असणे अभिप्रत व आवश्यक आहे.

१९. पालक आणि पाल्य अधिनियम १८९० कलम ४(१) प्रमाणे देवांश हा अज्ञान आहे. सदर कायद्याच्या कलम ४(२) नुसार अर्जदार आणि उत्तरार्थी हे देवांशचे पालक आहेत. देवांशच्या कल्याण व हितासाठी या कायद्याच्या कलम ६ आणि ७ मधील तरतुदींआधारे अर्जदाराची देवांशचे पालक म्हणून नियुक्ती करणे इष्ट आहे.

२०. उत्तरार्थी किशोरने देवांशचे संगोपन व देखभालीमध्ये कसूर केली आहे असे निदर्शनास येत नाही. मे २०२४ पासून आजपावेतो उत्तरार्थीने देवांशचा योग्यप्रकारे सांभाळ व संगोपन केले आहे. देवांशचे वय विचारात घेता त्याचा ताबा कोणाकडे असावा हे निवडण्याची परिपक्वता त्याचेकडे नसल्यामुळे त्याचे सर्वाधिक हितासाठी त्याचा ताबा त्याची आई म्हणजेच अर्जदार नम्रताकडे देणे न्यायोचित होईल. तथापि किशोर व त्याचे आईसोबतचे देवांशचे नाते तोडणे न्यायोचित ठरणार नाही. देवांशला त्याचे वडील किशोर व त्याचे वडीलांची आई यांचे प्रेम व वात्सल्य मिळण्यासाठी त्याला किशोरच्या सहवासात त्याचे घरी नेण्याची परवानगी देण्याचा आदेश करणे न्यायोचित ठरेल.

२१. उभय पक्षकार व त्यांचे सुविद्य वकील यांचे उपस्थितीत देवांशचा ताबा उत्तरार्थी किशोरकडे कधी व किती असावा याबाबत चर्चा केली असता दर सोमवारी सकाळी ११ ते सायंकाळी ६ या कालावधीत देवांशला किशोरने नम्रताकडून घेवून जावे व परत आणून सोडावे. दि.१३.१०.२०२५ रोजी देवांशचा वाढदिवस असल्याने दि.१२.१०.२०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता किशोरने देवांशला नम्रताकडून घेवून जावे व दि.१३.१०.२०२५ रोजी संध्याकाळी ६ वा. नम्रताकडे परत आणून सोडावे असे चर्चेद्वारे उभय संमतीने ठरले. दि.०६.१०.२०२५ रोजी उत्तरार्थी किशोरने देवांशला अर्जदार नम्रताकडे सुपुर्त करावे असे सुद्धा चर्चेअंती ठरले.

२२. उपरोक्त परिच्छेद क्र. १० ते २१ मधील विश्लेषण व कारणमिमांसेआधारे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष असा आहे की, देवांशचा ताबा अर्जदार नम्रताकडे देणे न्यायोचित ठरेल.

मुद्दा क्र.२–

२३. उपरोक्त परिच्छेद क्र.१० ते २१ मधील विश्लेषण व कारणमिमांसा व मुद्दा क्र.१ चे निष्कर्षाचे पार्श्वभुमीवर अंशतः अर्ज मान्य करणे आवश्यक आहे.

आदेश

अ. अर्ज अंशतः मान्य केला आहे.

ब. पालक आणि पाल्य अधिनियम १८९० कलम ६ व ७ अन्वये देवांशचे

पालक म्हणून अर्जदार नम्रता यांची नियुक्ती केली आहे.

क. अपीलाचा कालावधी संपल्यानंतर उत्तरार्थी किशोरने देवांशचा ताबा अर्जदार नम्रताला दयावा.

ड. दर सोमवारी सकाळी ११ ते सायंकाळी ६ या कालावधीत किशोरने देवांशला नम्रताकडून घेवून जावे व परत आणून सोडावे.

इ. देवांशचा वाढदिवस १३ ऑक्टोबर रोजी असतो. दरवर्षी १२ ऑक्टोबरचे संध्याकाळी ६ ते १३ ऑक्टोबरचे संध्याकाळी ६ या कालावधीत किशोरने देवांशला नम्रताकडून स्वतःचे घरी नेवून पुन्हा आणून सोडावे.

ई. अर्जदार व उत्तरार्थी यांनी देवांशचे मनात एकमेकांविरुद्ध मन कलुषीत करण्याजोगे कोणतेही विधान अथवा कृती न करणेची दक्षता घ्यावी.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.06 17:06:22 +0530

संगमनेर
दिनांक – ०३/१०/२०२५

(मंदार नेरलेकर)
जिल्हा न्यायाधीश–२ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
संगमनेर